# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-31.08.2026** **वार- सोमवार**

---

**राज्यपाल**

भटक्या-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य देण्याची गरज आहे असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाच्या वतीने आयोजित विमुक्त जाती दिनानिमित्त फर्ग्युसन महाविद्यालयातील राज्यस्तरीय कार्यक्रमात राज्यपाल बोलत होते. या समाजातील कोणत्याही बालकाचं शिक्षण त्यांच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे बाधित होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी असं त्यांनी यावेळी सांगितलं.

यावेळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आमदार डॉ.नीलम गोऱ्हे, भटके-विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धवराव काळे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज, संचालक सोनाली मुळे आदी उपस्थित होते.

या समाजासाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ घेण्याचं आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी यावेळी केलं.

**भाजपा बैठक**

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि विकासकामांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचं आवाहन भाजपा नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात कार्यकर्त्यांना केलं. भारतीय जनता पक्षाची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची बैठक आज गणेश कला क्रीडा रंगमंदिर इथं झाली, या बैठकीत फडणवीस बोलत होते.

देश पेट्रोल-डिझेलच्या बाबतीत परदेशांवर अवलंबून आहे, पण आगामी काळात शेतकरी आणि ईव्ही यावर पर्याय देतील असंही फडणवीस म्हणाले. विरोधी पक्षांच्या चुकीच्या प्रचार विरोधात ठोस भूमिका घेत त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. पुणेकरांनी सांस्कृतिक पद्धतीनं गणेशोत्सव साजरा करून राज्यासमोर आदर्श ठेवावा असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

विरोधी पक्षांवर टीका करण्यापेक्षा समाजातील प्रश्न सोडविण्यावर भर द्यावा, असं आवाहन भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना केलं.
या बैठकीला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रकांत पाटील, यांच्यासह भाजपचे विविध मंत्री आणि पदाधिकारी उपस्थित होते. संपूर्ण महाराष्ट्रातून या बैठकीला सुमारे साडेतीन हजार पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**ध्वनिप्रदूषण**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे ग्रामीण पोलिसांनी ध्वनिप्रदूषण आणि सुरक्षेबाबत कडक सूचना दिल्या आहेत. ध्वनिक्षेपकांची निर्धारित डेसिबल मर्यादा ओलांडल्यास गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिला आहे. प्लाझ्मा साउंड आणि प्रखर लेझर झोतांवर बंदी घालण्यात आली आहे.

**ऊसगाळप परवाना**

राज्यातील २०२६-२७ च्या ऊस गाळप हंगामासाठी साखर कारखान्यांना उद्यापासून ऑनलाइन गाळप परवाना अर्ज करता येणार आहे. सर्व सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांनी गाळप परवाना प्राप्त केल्यानंतरच हंगाम सुरू करावा, अशा सूचना साखर आयुक्त डॉक्टर संजय कोलते यांनी दिल्या आहेत.

परवान्याच्या अटींचं उल्लंघन केल्यास संबंधित साखर कारखान्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा साखर आयुक्तांनी दिला आहे.

**SIR**

महाराष्ट्रातील विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहिमेंतर्गत तयार करण्यात आलेल्या प्रारुप मतदार यादीनुसार पुणे शहर आणि जिल्ह्यातील एकंदर मतदारांची संख्या आता ६१ लाख ९८ हजार १०७ इतकी झाली आहे. या मोहिमेपुर्वी पुणे शहर आणि जिल्ह्यात एकंदर  ९० लाख ८० हजार १७३ इतके मतदार होते. या यादीनुसार पुणे शहर आणि जिल्ह्यातील मतदारांची संख्या सुमारे ३२ टक्क्यांनी कमी झाली आहे.

**नोंदणी**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेनं पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या निवासी डॉक्टरांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पुण्यासह राज्यातील सर्व शासकीय, महापालिका, खासगी आणि अभिमत महाविद्यालयांतील निवासी डॉक्टरांना प्रवेशाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत परिषदेचं कायमस्वरूपी नोंदणी प्रमाणपत्र घेणं आता अनिवार्य करण्यात आलं आहे. परिषदेनं २७ ऑगस्ट रोजी हे परिपत्रक काढलं असून मार्डनं या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

**नंदूमराठे श्री**

स्वराज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचा ऋषिकेश बेळमकर ५७व्या आंतरमहाविद्यालयीन ‘नंदू मराठे श्री’ शरीरसौष्ठव स्पर्धेचा विजेता ठरला आहे. आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या खुल्या सभागृहात ही स्पर्धा झाली. पुणे शहर, जिल्हा, अहिल्यानगर आणि नाशिकमधील २५ महाविद्यालयांच्या ६३ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. विविध वजनी गटांत ही स्पर्धा घेण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३० तर किमान २२ पूर्णांक १ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. काही ठिकाणी आकाश अंशतः ढगाळ होतं. उद्याही हवामान साधारण असंच असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.